# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४२७/२०२३ दिनांक – १३/१२/२०२३

**नेपाळ देशातील रुपन्देही पोलीस ठाणे मध्ये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहरीत मुलीचा शोध घेण्यास, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा विभागाला यश**

रुपन्देही पोलीस ठाणे (नेपाळ) येथे गु.रजि.नं ४३१५/२०८० अपहरणाचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील अपहरीत मुलगी रा.जिल्हा- रुपनदेही ,लुम्बीनी प्रदेश, देश नेपाळ हीचा नालासोपारा परीसरामध्ये राहत असलेबाबत KIN INDIA एनजीओच्या मदतीने तीचा नालासोपारा येथे शोध घेवुन तीस तीचे मुळ देश नेपाळ येथे दिल्ली तीच्या आईवडीलांकडे पाठविणकरीता बालकल्याण समिती पालघर यांचे मार्फतीने KIN INDIA एनजीओच्या माध्यमातुन तीच्या पालकांच्या ताब्यात देण्याकरीता नेपाल देशात पाटविण्यात आली आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी की, यातील अपहरीत मुलगी ही नालासोपारा येथे राहत असलेबाबत KIN INDIA संस्थेचे निर्देशक श्री.नवीन टेकलाल जोशी व श्रीमती लक्ष्मी बिस्ट खडका यांना माहीती मिळाली. त्यानंतर नेपाळी राजदुतावास यांच्या निर्देश व परवानगीने सदर अल्पवयीन मुलीचा शोध घेवुन तीस तीचे पालकांचे ताब्यात देणेकरीता श्री.नवीन टेकलाल जोशी हे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधकक्ष नालासोपारा येथे आले. त्यांनतर त्यांनी सदर अपहरणाच्या गुन्हयाची माहीती दिल्यावर तात्काळ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधकक्ष नालासोपारा कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ अपहरीत मुलीचा शोध घेणेकामी मिळालेल्या माहीतीनुसार धानीवबाग येथे सलग दोन दिवस तांत्रिक माहीतीच्या आधारे शोध घेवुन धानीवबाग येथे जावुन तेथील रहीवाशी चाळींमध्ये सदर मुलीचा शोध घेतला असता ती मिळुन आली असुन तीस बालकल्याण समिती पालघर यांचे कडे हजर करुन तीस KIN INDIA संस्थेचे निर्देशक श्री.नवीन टेकलाल जोशी व श्रीमती लक्ष्मी बिस्ट खडका यांचेकडे नेपाळी राजदुतावास ,नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार तीच्या पालकांच्या ताब्यात देण्याकरीता नेपाल देशात पाटविण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास KIN INDIA संस्थेचे निर्देशक नेपाळी राजदुतावास ,नवी दिल्ली यांच्या मदतीने केला सदरचा तपास हा मा. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अविनाश अंबुरे, मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.बल्लाल यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा युनिटचे पो.नि. संतोष चौधरी पो.हवा. रोशन नारायण किणी, महेंद्र पुंडलिक शेटये, शिंदे ,म.पो.हवा. साक्षी डोइफोडे, म.पो.अं. काजल प्रदीप पाटील, चा.पो.हवा.सुनिल विष्णु पागी,सर्व नेम. अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा यांनी केला आहे.